Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परीक्षा विभाग
## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी 2020 सत्राच्या परीक्षा दि. 27 ऑक्टोबर 2020 पासून सुरू होत आहेत. सदरच्या परीक्षा या ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने होणार आहेत. यासंदर्भात सर्व परीक्षार्थींना कळविण्यात येते की,

1. परीक्षार्थींना सुरूवातीला एस.एम.एस/ई–मेल द्वारे पाठविण्यात आलेले लॉगइन (परीक्षार्थीचा PRN) आणि पासवर्ड पूर्ण परीक्षेसाठी तोच राहील वेगळा पासवर्ड असणार नाही.
2. परीक्षार्थींनी परीक्षा देण्यासाठी ऑनलाईन/ऑफलाईन यापैकी कोणताही एक पर्याय निवडला असेल (यापुर्वी परीक्षा विभागामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीनुसार) त्याच पर्यायाने परीक्षा देणे आवश्यक आहे. तथापि एखाद्या परीक्षार्थीने ऑफलाईन आणि ऑनलाईन दोन्ही पध्दतीने एखाद्या विषयाची परीक्षा दिल्यास परीक्षार्थीने ऑफलाईन पध्दतीने दिलेल्या परीक्षेचे गुणच निकाल घोषित करण्याकरिता विचारात घेतले जातील. परीक्षार्थींनी परीक्षा विभागामध्ये घोषित केलेल्या यादीमध्ये नमूद केल्यानुसार ऑनलाईन/ऑफलाईन यापैकी एकाच पध्दतीने परीक्षा देणे आवश्यक आहे. तसेच ज्यांची नावे सदरच्या यादीत नमूद आहेत त्यांनाच परीक्षा देता येणार आहे.
3. उपरोक्त नमूद यादीनुसार ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना मोबाईल स्मार्टफोन/लॅपटॉप/डेस्कटॉप काम न करणे अशा कारणास्तव ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देता येईल. संबंधीत विद्यार्थ्यांने ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देत असल्याचे अर्जाद्वारे परीक्षार्थींच्या संबंधीत अधिविभागाचे विभागप्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याकडे परीक्षेपूर्वी अर्जाद्वारे विनंती करावी. संबंधित विभाग/महाविद्यालये यांनी सदर परीक्षार्थींची ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घ्यावी व परीक्षार्थींनी विनंतीचा तपशील (परीक्षार्थींचे नाव, ऑफलाईन पध्दत, पीआरएन, बैठक क्र., विषय, विषयाचे नाव) संबंधित परीक्षा विभागाकडे सत्वर सादर करावा. तसेच यापूर्वी ज्या परीक्षार्थींनी फक्त ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडलेला आहे अशा विद्यार्थ्यांना वरील कारणास्तव ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देता येईल. तथापि, तांत्रिक कारणास्तव यापूर्वी ज्या परीक्षार्थींनी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडलेला आहे त्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देता येणार नाही.
4. अपवादात्मक परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव एखाद्या परीक्षार्थीला परीक्षा देता आली नाही अशा परीक्षार्थ्यासाठी विद्यापीठामार्फत फेरपरीक्षा आयोजित करण्यात येणार असून त्याबाबतची माहिती स्वतंत्रपणे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परिपत्रकाद्वारे सर्व अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येणार आहे.

5. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देत असताना परीक्षार्थीकडून सदरचा पेपर सबमिट न होता कोणत्याही कारणास्तव संगणकीय प्रणाली, संबंधित परीक्षार्थीचे उपकरण बंद पडले तर यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने सोडविलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपोआप सेव्ह होउन सबमिट होणार आहेत याची कृपया परीक्षार्थीनी नोंद घ्यावी.
6. ब–याच विषयाच्या परीक्षासाठी कॉमन पेपर कोड आहेत. तर अशावेळी सदरच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न अभ्यासक्रमानुसार आहेत याची खात्री करावी व परीक्षा देण्यात यावी. पेपर कोडची पडताळणी होत नाही याकारणास्तव परीक्षार्थींनी गोंधळून जावू नये.
7. सर्व परीक्षार्थींनी प्रवेशपत्र(हॉलतिकीट) आणि लॉगइनमध्ये तातडीने स्वतःच्या परीक्षेच्या सुधारित वेळापत्रकाची पडताळणी करावी आणि त्यानुसार परीक्षेची तयारी करावी.
8. तसेच यापुर्वीच्या परिपत्रक शिवाजी वि/परीक्षा विभाग/192 दि.23/10/2020 रोजीनुसार प्रश्नपत्रिकेतील त्रुटीसंदर्भात विद्यार्थ्यांनी उपकुलसचिव/परीक्षा नियुक्ती, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर, 416004 यांच्याकडे परीक्षा झाल्यापासून सात दिवसाच्या आत विभागप्रमूख/प्राचार्य यांच्यामार्फत योग्य त्या कागदपत्रासहीत सादर करावीत.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र: शिवाजी वि/परीक्षा विभाग/** 195
**दिनांक : २६/१०/२०२०**

प्रति,

१) मा. अधिविभागप्रमूख/संचालक/ सर्व पदवी आणि पदव्युत्तर अधिविभाग
२) मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था
३) मा.संचालक, दूर शिक्षण केंद्र.
४) मा. उपकुलसचिव/सहा. कुलसचिव/समन्वयक-सर्व प्रशासकीय विभाग.
5) समन्वयक, इंटरनेट कक्ष - संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.